म.सं.कौ.हि.का.क्र.०८/२०२४

पोर्णिमा वि. उमाजी

**नि.क्र. २९ खाली**

**<u>अर्जदार तर्फे साक्षदार क्रमांक १ अर्जदार स्वतः यांचा उलटतपास गैरअर्जदारातर्फे अधिवकता श्री. पी.एन.अटाळकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू –</u>**

**४.** माझे पहिले लग्न दिनांक २९/०५/२००५ रोजी निलेश पांडुरंग वागोते यांच्या सोबत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला पहिल्या लग्नापासुन एक मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पहिले लग्न हे हिंदु धर्मच्या रितीरिवजाप्रमाणे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पहिल्या पतीपासुन झालेले घटस्फोट कुठल्याही समक्ष न्यायालयासमक्ष झाही. आता मला नि.क्र. ३८ वरील दस्ता दाखविण्यात आला हा दस्ता माझ्या पहिल्या पतीपासुन झालेल्या घटस्फोटाबाबत आहे.

**५.** आता मला नि.क्र.३६ सोबत जोडलेला दस्त दाखविण्यात आला. हा दस्त माझ्या पहिल्या पतीसोबत दिनांक २०/०४/२०१२ रोजी नोटरीसमक्ष मुद्रांक शुल्क २०० च्या स्टॅम्प पेपरवर झालेल्या घटस्फोटाबाबत आहे त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर बरोबर आहे.

**गैरअर्जदारतर्फे अधिवक्तानी सदरील दस्ताला निशाणी देण्यात विनंती केली. सदरील दस्ताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दस्ताची पडताळीत प्रत दाखल आहे. अर्जदाराला त्याची अस्सल प्रत बद्दल विचारले असतांना उपलब्ध नसल्याचे दर्शविले. दस्ताऐवज दिनांक १४/११/२०२५ रोजी सक्षम न्यायालयीन कर्मचाऱ्यामार्फत पडताळीत केले आहे करिता त्यास नि.क्र. ४७ देण्यात येते.**

**६.** हे म्हणणे खरे आहे की, वरील नमुद घटस्फोट तयार करतेवेळेस मी, माझे पहिले पती, साक्षीदार तसेच नोटरी अधिकारी हजर होते, यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पहिल्या पतीपासुन कुठलाही कायदेशीर घटस्फोट न घेता गैरअर्जदार क्र. १ ची फसवणुक करुन त्याच्यासोबत लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पहिल्या पतीपासुन, नोटरीवर घटस्फोट झाल्यामुळे मी गैरअर्जदार क्र. १ ची कायदेशीर पत्नी नाही. दिव्यांका माझ्या पहिल्या पतीपासुन झालेली मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिव्यांकाच्या जन्म दाखल्यामध्ये मी गैरअर्जदार क्र. १ ची फसवणुक करुन वडलांच्या रखान्यामध्ये गैरअर्जदार क्र. १ चे नाव नमुद केले आहे.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, दिव्यांका हिचा KG–one पासुन आतापर्यंतचा शिक्षणाचा खर्च गैरअर्जदार क्र. १ नी केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिव्यांका नागपूर येथे NEET परिक्षेकरिता शिक्षण घेत असुन त्याचा खर्च हा गैरअर्जदार क्र. १ करत आहे, याव्यतिरिक्त तिचा राहण्याचा खर्च तसेच दवाखान्याचा खर्चही गैरअर्जदार क्र. १ करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. २ व ३ माझे नातेवाईक नाही. मी शपथपत्रामध्ये गैरअर्जदार क्र. १ चे गैरअर्जदार क्र. २ व ३ सोबत अनैतीक संबंधाबाबत उल्लेख केला असुन त्याबद्दलची कुठलेही दस्ताऐवज मी न्यायालयासमक्ष सादर केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदारांना मानसीक त्रास देण्याच्या हेतुने वारंवार त्यांच्या कामाच्या ठिकाणी व पोलीस स्टेशन येथे तक्रार करीत आहे.

८. आता मला माझ्या शपथपत्रामधील परिच्छेद क्र. ३ मधील पान क्र. ३ "गैरअर्जदार क्र. १.............................करीत आहे." वाचुन दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, वरील नमुद घटना कधीही घडली नसुन शपथपत्रामध्ये त्याबद्दल खोटे उल्लेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ ला मानसीक व शारिरीक त्रास देण्याच्या हेतुने त्यांची फसवणुक करून खोटे लग्न केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पुर्ण</u>
<u>फेरतपास काही नाही.</u>

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
(आशू दिनेश पटेल)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
राजुरा (कोर्ट नं.२)
दिनांक १९/०६/२०२६

माझे समक्ष,

स्वा/–
(आशू दिनेश पटेल)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
राजुरा (कोर्ट नं.२)
दिनांक १९/०६/२०२६